**रे.दि.मू.नं. २४०/२०१२ मधील नि. ५२ खालील आदेश**
**( नाना रिठे विरूध्द विनोदकुमार पांडे )**
**(आदेश पारीत दि. १६/११/२०१८)**

सदरचा अर्ज वादी यांनी यातील प्रतिवादी नं. ६ हे दि. १३/०९/२०१८ रोजी मयत असून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेकरिता तसेच त्यांचे नावास आळे करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास प्रतिवादीने म्हणणे दाखल केले.

दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला, वादी मागणी करत असलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद संपुष्टात आणणेकरिता प्रतिवादी नं. ६ चे वारस रेकॉर्डवर घेणेचा आदेश पारीत करणे व त्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी देणे गरजेचे वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ५२ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी नं. ६ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घ्यावेत व त्याप्रमाणे दाव्यामध्ये विहीत कालावधीत दुरूस्ती करावी.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. १६/११/२०१८**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**